# गोव्यात 'जम्पिंग स्पायडर'च्या नव्या प्रजातीचा शोध

## 'अफ्राफ्लासिया गोवाएन्सिस' असे नामकरण : चोडण बेटावरील खारफुटीच्या झाडांमध्ये अधिवास

पिनाक कल्लोळी
गोवन वार्ता

**पणजी :** गोव्यात जम्पिंग स्पायडरच्या (कोळी) नव्या प्रजातीचा शोध लागला आहे. याचे 'अफ्राफ्लासिया गोवाएन्सिस' असे नामकरण करण्यात आले आहे. गोवा विद्यापीठाच्या प्राणीशास्त्र विभागाचे डॉ. नितीन सावंत, विभुती गावस यांच्यासह केरळ येथील क्राईस्ट महाविद्यालयाचे ऋषिकेश त्रिपाठी व ए. व्ही. सुधीरकुमार या चौघांनी ही प्रजाती शोधून काढली आहे. संपूर्ण भारतात सहाव्यांदा आणि गोव्यात प्रथमच ही प्रजाती आढळून आली आहे.

याबाबतचे संशोधन तक्रियात मोदोरस युनिव्हर्सिटी प्रेस या आंतरराष्ट्रीय शोधपत्रिकेमध्ये १७ जानेवारी रोजी प्रकाशित झाले आहे. हा कोळी चोडण बेटावरील खारफुटीच्या झाडांमध्ये आढळला. यावर शास्त्रीय पद्धतीने अभ्यास केल्यानंतर तो जम्पिंग स्पायडर असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर त्याचे नाव 'अफ्राफ्लासिया गोवाएन्सिस' असे ठेवण्यात आले आहे. या संशोधनात गोवा विद्यापीठात मास्टर्स डिग्री शिकणाऱ्या विभुती गावस यांनी महत्त्वाची भूमिका बजावली.

अफ्राफ्लासिया हे कोळ्यांच्या जंपिंग स्पायडर (साल्सीसिडाय) कुटुंबातील आहेत. याआधी या प्रजातीचे कोळी तमिळनाडू, केरळ, गुजरात, राजस्थान या राज्यात सापडले होते. जगभरात ६ हजारहून अधिक प्रकारचे जंपिंग स्पायडर सापडतात. आतापर्यंत भारतात याच्या सहा प्रजाती सापडल्या आहेत. या कोळ्याच्या प्रजाती आफ्रिका, ऑस्ट्रेलिया, आशिया, युरोप या खंडात आढळल्या आहेत.



(विभुती गावस)



Tarbiat Modares University
Journals System

**Volume 10, Issue 1 (2024)** J. Insect Biodivers. Syst 2024, 10(1): 125-132 |

# A new species of Afraflacilla Berland & Millot, 1941 (Araneae, Salticidae) from India

Vibhuti U. Gawas[1], Rishikesh Tripathi *[2], Ambaraparambil Vasu Sudhikumar[3], Nitin S. Sawant[1]

*1- School of Biological Sciences and Biotechnology, Goa University, Taleigao Plateau, Taleigao, Goa 403 206, India*

*2- Centre for Animal Taxonomy and Ecology, Department of Zoology, Christ College, Irinjalakuda, Thrissur, Kerala 680 125, India , rishikesh.tripathi14@gmail.com*

*3- Centre for Animal Taxonomy and Ecology, Department of Zoology, Christ College, Irinjalakuda, Thrissur, Kerala 680 125, India*

**Abstract:** (72 Views)

A new species of jumping spiders (Araneae, Salticidae), *Afraflacilla goaensis* Gawas & Tripathi **sp. nov.**, is described, diagnosed and illustrated based on a single male specimen collected from a mangrove in Goa, India. Considering this finding, the genus *Afraflacilla* previously known from the Indian states of Tamil Nadu, Kerala, Gujarat, and Rajasthan, is now documented for the first time in Goa. Finally, the Indian records of the genus *Afraflacilla* are mapped.

Link: https://jibs.modares.ac.ir/article-36-73476-en.html